# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

**अधिसभा निवडणूकसाठी प्राचार्य मतदारसंघाची**
**तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत**

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(ण)[(28(2)(o)] अन्वये प्राचार्य गटाने त्यांच्यामधून दहा प्राचार्य अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या प्राचार्य मतदारसंघाची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहीत) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे.

सदर तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी **शुक्रवार, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२२ ते मंगळवार, दिनांक १३ सप्टेंबर, २०२२** स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे :**

१. विद्यापीठाच्या https://bcud.unipune.ac.in या लिंकवर Teacher Profile मध्ये login करुन Registration for Election 2022 या लिंकवर click केल्यास आपल्या अर्जाबाबतची स्थिती पाहता येईल.

२. यासंदर्भात तात्पुरत्या मतदार यादीमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर तेथे उपलब्ध करुन दिलेल्या Fill Grievance या लिंकवर click करावे व तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी.

नोंदणीस अपात्र ठरलेल्या अर्जांबाबत कोणतेही दस्तऐवज अथवा कागदपत्रे नव्याने अपलोड करता येणार नाहीत किंवा स्विकारली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/८४
दिनांक : ०८/०९/२०२२